**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 6.471
Volume - 6, Issue - 7, July - 2023 Publication Date: 20/07/2023

DOIs:10.2018/SS/202307011 --:-- Research Paper / Article / Review

# ‘भारतीय समाजातील वृद्धांच्या समस्या आणि संविधानात्मक तरतुदी’

**Dr. Gajendra M. Kadhav**
Head, Department of Sociology, M.G. College, Armori, Dist. Gadchiroli
Email - gajendrakadhav@gmail.com

**सारांश :** भारतीय समाजात जेष्ठ लोकांची समस्या एक गंभीर प्रश्न आहे. ही समस्या फक्त भारतापुरतीच मर्यादित नसून ती संपुर्ण जगामध्येच असल्याची दिसून येते. भारतात प्राचीन काळामध्ये बघितल्यास ज्येष्ठ आणि वयोवृद्ध व्यक्तीविषयी आदरभाव व्यक्त केल्याचे अनेक पुरावे पहायला मिळतात. संयुक्त कुटुंबपद्धती यांचे जीवंत उदाहरण होते. कारण या कुटुंबात कुटुंबातील सर्व उपयुक्त निर्णय हे वृद्ध व्यक्ती घेत असत. कुटुंबामध्ये आणि समाजामध्ये वृद्ध आणि जेष्ठ व्यक्तींना मोठ्या प्रमाणात मान-सन्मान मिळत होता तसेच त्यांनी घेतलेले निर्णय हे कुटुंबातील सर्व सदस्यांना बंधनकारक होते. परंतु औद्योगिकरण, शहरीकरण लोकसंख्या वाढ, भूमीचे उपखंडन, व्यक्तिवादी विचार, स्वार्थ केंद्रित प्रवृत्ती अशा अनेक कारणामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन होत गेले आणि यातूनच पुढे वृद्धांचा समस्या निर्माण झाल्या. म्हणूनच आज व्यक्ती आयुष्यभर जीवंत राहणे पसंद करतो पण वृद्ध होणे त्याला आवडत नाही.

**कि-वर्ड :** भूमीचे उपखंदन, व्यक्तिवादी विचार, औद्योगिकरण, शहरीकरण, संयुक्त कुटुंबपद्धती .

### 1. प्रस्तावना :

भारतीय समाजात प्राचीन काळापासून ज्येष्ठ, वयोवृद्ध व्यक्तीविषयी आदरभाव व्यक्त केल्याचे अनेक पुरावे पहायला मिळतात. संयुक्त कुटुंबपद्धती यांचे जीवंत उदाहरण होते. कारण या कुटुंबात कुटुंबातील सर्व उपयुक्त निर्णय हे वृद्ध व्यक्ती घेत असत. त्याचप्रमाणे ”मातृदेवो भव। पितृदेवो भव“ ही असली प्राचीन संस्कृती राहिलेली आहे. व्यक्तीच्या मृत्यूनंतरही श्राद्ध करणे, तेरवी करणे ही आपली परंपरा प्राचीन काळापासून आजही अस्तित्वात आहे. परंतु औद्योगिकरण, शहरीकरण लोकसंख्या वाढ, भूमीचे उपखंडन, व्यक्तिवादी विचार, स्वार्थ केंद्रित प्रवृत्ती अषा अनेक कारणामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन होत गेले आणि यातूनच पुढे वृद्धांचा समस्या निर्माण झाल्या व्यक्ती आयुष्यभर जीवंत राहणे पसंद करतो पण वृद्ध होणे त्याला आवडत नाही. हे एक हास्यापद बाब आहे.

भारतीय समाजात जेयष्ठ लोकांची समस्या एक गंभीर प्रश्न आहे. ही समस्या फक्त भारतापुरतीच मर्यादित नसून ती संपुर्ण विश्वामध्येच असल्याची दिसून येते. म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघाने हया समस्येचे जागतिक स्वरूप लक्षात घेवून 1999 हे आंतरराष्ट्रीय जेष्ठ लोकांचे वर्ष म्हणून घोषित केले होते.

### 2. वृद्ध व्यक्ती म्हणजे काय?

ज्येष्ठ ही संज्ञा इतरांपेक्षा वयाने मोठया असलेल्या व्यक्तींसाठी उपयोगात आणली जाते. उदा. ज्येष्ठ भाऊ म्हणजेच वयाने मोठा असलेला. यावरून लक्षात येते की, ज्येष्ठत्वाचा आधार वयोमर्यादा आहे.

वयोवृद्ध व्यक्ती कोणास म्हणावे याबाबतीत शास्त्रज्ञांमध्ये एकसुत्रता नाही. प्रसिद्ध मानसषास्त्रज्ञ एलिझाबेथ हरलॉक यांनी जेष्ठ व्यक्तीचे दोन कालखंडात विभाजन केले आहे. जसे 1) 60 ते 70 वयोगटातील 2) 70 पेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्ती जेरेमी टनस्टॉल यांनी “old & Alone” या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात 65 वर्षावरील व्यक्तींचा समावेश जेष्ठ लोकांत केलेला आहे.

थोडक्यात सांगावयाचे झाल्यास असे निदर्षनात येते की वृद्ध व्यक्ती कोणास म्हणावे यात वेगवेगळे मतांतर असले तरी साधारण 60 वर्षे ही वयोमर्यादा वृद्ध व्यक्तीसाठी स्विकार करण्यात आलेली आहे.

### 3. भारतातील वृद्ध लोकांची संख्या :

भारतात वृद्ध लोकांच्या संख्येत निरंतर वाढ होत आहे. ज्याप्रमाणे देशात लोकसंख्या वाढत आहे. त्याचप्रमाणे देषाचे सरासरी आयुमान सुद्धा वाढत आहे. आज देषाचे आयुमान 60 च्या वर गेलेले आहे. याला प्रमुख कारण म्हणजे औषधे, दवाखान्याची सोय, आधुनिक उपचार पद्धती, पोषक आहार इत्यादी आहेत.

**भारतातील 60 वर्षावरील वृद्ध लोकांची संख्या दर्शविणारा तक्ता**

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण संख्या (दशलक्ष) | २४.७ | ३२.६ | ४१.१ | ५६.६ | ७६.६ | १०३.८ |

**4. जेष्ठ लोकांच्या समस्यांची कारणे:**

**1) औद्योगिकरण:-** औद्योगिकरणामुळे नागरी स्थलांतराचे प्रमाण फार मोठया प्रमाणात वाढले. शहरात जागेची कमतरता, अल्प उत्पन्न, महागाई यामुळे वृद्धांचा साभाळ करणे अषक्य होत गेले एकुणच औद्योगिकरणामुळे जेष्ठ व्यक्तीच्या समस्यात वाढ होत आहे.

**2) संयुक्त कुटूंबाचे विघटन:-** संयुक्त कुटुंबात दोन पेक्षा जास्त पिढयांचे सदस्य एकत्र राहतात. सामान्य भोजन, सामान्य संपत्ती हे सयुक्त कुटुंबाचे मुलभूत लक्षणे आहेत. या प्रकारचा कुटुंबात संपूर्ण सत्ता ही जेष्ठ व्यक्तीकडे असायची. त्यामुळे जेष्ठ व्यक्तीचा सांभाळ करण्याची समस्या निर्माण होत नव्हती. परंतु आज औद्योगिकरण, नागरीकरण, लोकसंख्यावाढ इ. कारणाने संयुक्त कुटुंबाचे विघटन होत आहे व ज्येष्ठ व्यक्तीच्या भुमिका कुचकामी ठरत आहे. यामुळेच वृद्धांच्या समस्येत वाढ होत आहे.

**3) व्यक्तिवादी विचार:-** आज प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वार्थाच्या विचार करू लागली. त्यामुळे मुलाला आईवडील, सुनेला सासूसासरे अडचण भासू लागले. यातूनच वृद्धांच्या समस्या वाढीस लागल्या आहेत.

यاप्रमाणेच नागरीकरण, शेतीचे उपखंडन, महागाई इ. वृद्धांच्या समस्याचंी कारणे सांगता येतात.

**5. वृद्धांच्या समस्या:**

वृद्धावस्थेच्या समस्येला प्रामुख्याने खालील भागामध्ये विभाजित करता येते.

**1) सामाजिक समस्या**:- ज्येष्ठ लोकांची वाढती संख्या हीच एक सामाजिक समस्या आहे. वृद्धांच्या सामाजिक समस्या खालीलप्रमाणे सांगता येतात.

अ) वृद्धव्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलत असल्याने समाजात त्यांना कमी महत्व दिले जाते.

ब) वृद्धांच्या निरंतर सामाजिक दर्जा घसरत असल्याने वृद्धांना आपल्या निष्क्रिय जीवनाची जाणीव होत जाते.

क) वृद्धांसोबत कुटुंबातील सदस्य मुद्दाम दुर्लक्ष करतात. त्यांच्यांषी कोणीही बोलत नाही. अषावेळी त्यांना समाजात एकाकी जीवण जगावे लागते.

ड) वृद्ध व्यक्ती अषावेळेस ताण-तणावात जीवन जगत असतात.

इ) आधुनिकता आणि परंपरा यामध्ये तरूण आणि वृद्धांचे संघर्ष निर्माण होते. तरूण सदस्यांना परंपरागत विचार पसंद येत नाही.

अशा प्रकारचा अनेक सामाजिक समस्यांना वृद्ध व्यक्ती बळी पडत असते.

**2) आर्थिक समस्या:-**

वृद्ध व्यक्तिचे शरीर थकल्या मुळे कोणतेही काम ते करू शकत नाही. यामुळे त्यांची आर्थिक कुचंबणा होते. वृद्धांना कोणत्या आर्थिक समस्या भेडसावतात. त्या खालीलप्रमाणे आहेत.

अ) वृद्ध व्यक्ति आपल्या थकलेल्या शरीरामुळे काम करून पैसा कमविण्यासाठी असमर्थ ठरतात. अषावेळी त्यांना गरीबीतच आपली जीवन यात्रा भोगावी लागते.

ब) या गरीबीमुळे भिक्षावृत्ती, कर्जबाजारीपणा अषा समस्यांना वृद्ध बळी पडत असतात.

क) आर्थिक प्राप्ती नसल्यामुळे उपासमारी, परावलंबीत्व वाढीस जात असते.

**3) मानसिक समस्या:-**

वृद्ध व्यक्तींचा सामाजिक दर्जा घटल्यामुळे त्यांच्यावर मानसिक आघात होतात. यामुळे वृद्धांना सामाजिक, आर्थिक समस्यां बरोबरच मानसिक समस्या सुद्धा भेडसावत असतात.

अ) वयामुळे व्यक्तीचे मानसिक बदल होणे अपरिहार्य आहे. यामुळे वृद्धांची स्मरणषक्ती क्षीण होते अािण त्यांच्यात विसराळूपणा वाढतो.

ब) वृद्धांत मानसिक वैफल्य, एकाकीपणामुळे न्यूनगंडाची भावना वाढत जाते.

क) वृद्ध व्यक्ती वयामुळे अतिसंवेदनक्षम होत असल्यामुळे त्यांच्यात लहान लहान गोष्टीवरून रागाविणे, संषयीपणा, भांडखोरपणा वाढू लागते.

एकूणच वृद्ध व्यक्ती अनामिक भीती, चिंता, हट्टीपणा, विसरभोळेपणा, मानसिक वैफल्या अषा प्रकारच्या मानसिक समस्यांना बळी पडतात.

**4) स्वास्थ व आरोग्यविषयक समस्या:-**

वृद्धावस्थेमुळे शरीरावर असंख्य दूरगामी परिणाम होत असतात. यांचे स्वरूप अंतर्गत व बाध्य प्रकारचे असते.

अ) अंतर्गत समस्या:- अस्थी ठिसूळ होणे, पेषीचे विभाजन थांबणे, खांदे खाली झूकणे, हातापायाला कंप येणे, रोगप्रतिकार शक्तीचा ऱ्हास होणे, हृदय, किडनी, पचनसंस्था परावर्तित होणे. त्याचबरोबर कार्यक्षमतेचा ऱ्हास , श्रवणदोष, दृष्टिदोष अषा प्रकारच्या समस्या वृद्धांमध्ये निर्माण होतात.

ब) बाह्य समस्या:- बाहय समस्येमध्ये त्वचेवर सुरकुत्या पडणे, त्वचेचे तेज लोप पावणे. केस पांढरे होणे, नखांना विकृती येणे, कुबड निघणे इत्यादी समस्या येतात.

**6. वृद्धांच्या समस्यानिमृलनार्थ संविधानात्मक तरतुदः-**

भारतात वृद्धांच्या समस्या निमृलनासाठी वृद्ध व्यक्ती कल्याण कार्यक्रम ख्रिश्चन मिशनर्यांनी सर्वप्रथम सुरू केले. त्यांनी अपंग, अनाथ, अषक्त लोकांना आश्रय दिला.

केंद्र सरकारने सुद्धा वृद्धांच्या समस्येवर चिंता व्यक्त करून वृद्धांसाठी काही संविधानात्मक तरतुद, कायदे आणि त्यांच्या समस्या निमृलनासाठी कल्याणकारी योजना आखल्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

अ) भारतातील राज्यघटनेत कलम 41 प्रमाणे वृद्धांसाठी, विकलांग व्यक्तीसाठी मदत पुरविणे असे बंधन घातले आहे. त्यानुसारच आज विभिन्न राज्ये वृद्धांसाठी योजना आखत आहेत.

ब) 1956 साली “Hindu Adoption and Maintenance” हा कायदा पास करून या कायदयात प्रत्येक व्यक्तीने आपल्या वृद्ध आईवडीलांचे पोषण करावे असे बंधन घातले आहे. त्याचबरोबर वृद्धाश्रम, दिनकेंद्रे, गृहसेवा, निवृत्तीवेतन व भविष्यकालीन निर्वाह निधी याप्रकारच्या योजनांचा स्विकार सुद्धा भारतांनी केलेला आहे.

क) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 125 अन्वये, वृद्ध आईवडील त्यांच्या मुलांकडून देखभालीचा दावा.
करू शकतात.

ड) पालक आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल आणि कल्याण कायदा 2007, या कायदयात ज्येष्ठ नागरिकांची देखभाल करणे त्यांच्या मुले किंवा वारसांना बंधनकारक आहे.

वृद्धांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सरकार सुद्धा पुर्णतः कटिबद्ध आहे. परंतु स्थानिक पातळीवर या योजनांची प्रभावी अंमलबजावणी न होणे, वृद्धांकडून तक्रार न येणे यामुळे वृद्धाच्या समस्येत वाढ होत आहे.

**7. वृद्धांच्या समस्येवर काही उपाययोजना:-**

वरील कायदे व संविधानात्मक सवलती वृद्धांना देण्यात आल्या तरीपण त्यांच्या समस्या यामुळे पुर्णतः सोडविल्या जावू शकत नाही. वृद्धांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टिने काही उपाय योजना सुचविल्या जावू शकतात.

1) वृद्धांकरिता औषधे दवाखाने, सुश्रूषा इत्यादीची सोय मोफत करण्यात यावी.
2) संपूर्ण वृद्धांकरिता आरोग्यबिम्याची व्यस्था करायला पाहिजे.
3) जे वृद्ध धडधाकट व मानसिकदृष्टया सक्षम आहेत अषांना सेवानिवृत्त करायला पाहिजे.
4) त्यांच्याकरिता मनोरंजनात्मक सोयी उपलब्ध करायला पाहिजे. तसेच जेयष्ठ व्यक्तींचे मंडळ स्थापन केली पाहिजे.
5) वृद्धांच्या वृद्धावस्थेतील भुमिका निष्चित करून त्यांना समाजात विषिष्ट दर्जा देण्यात यावा.
6) वृद्धांसाठी काम करणाऱ्या खाजगी संस्था, स्वंयसेवी संस्था यांना अनुदान देण्यात यावे त्यामुळे या संस्था प्रामाणिकपणे काम करू शकेल.

याप्रकारे उपाययोजना केल्यास काही प्रमाणात तरी वृद्धांच्या समस्या कमी करता येईल.

## संदर्भ

1. खडसे भा. कि:- भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिसिंग हाऊस मुंबई, 2004 पृष्ठ क्र. 144-148
2. शेखशब्बीर आणि पालकर जी. के: सामाजिक समस्या, संगम प्रकाशन, नागपूर 1978, पृष्ठ क्र. 63, 70
3. भारतीय समाज विज्ञान कोष
4. हसेन, एस. अबीद:- भारताची राष्ट्रीय संस्कृती, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली.
5. मुखर्जी, रविंद्रनाथ:- 'सामाजिक समस्या' विवेक प्रकाशन, जवाहर नगर, दिल्ली 2009
6. पाठक, संगीता:- भारतीय समाजातील समस्या व वाद, डायमण्ड प्रकाशन, पुणे 2009
7. Bhagat, R.B. and Unisa, S. (2006) “Ageing and Dependency in India: A New Measurement”, Asian Population Studies, Vol. 2, No. 2, pp. 201-214.
8. Bhagat, R.B. and Kumar, K. (2011) ‘Ageing in India : Trend and Patterns’ in Ageing in
9. India : Some Emerging Issues, Edited by K.N.S. Yadava and Alok Kumar, Manak
10. Publications, New Delhi, pp. 19-37.
11. Bhat, P.N. Mari (2001) “Indian Demographic Scenario, 2025” Population Research Centre, Institute of Economic Growth, Delhi.